# प्रेम करावे सकलांवरती

चाल ÷ भिमा घे पुन्हा जन्म तू या दिनासाठी

------------

मानवा प्रेम तू करावे, सकलांवरती
जशी नभ धर्तीची आहे प्रिती ॥धृ ॥ मानवा प्रेम तू...

जसा पतंग दिव्यावर, अविरत प्रेम करतो
स्वाती बुंदासाठी तो, चातक पक्षी झुरतो
पहा नदी सागराला आनी भर्ति ॥१ ॥ मानवा प्रेम तू...

कस्तूरी नाभीमाजी, मृग वनात शोधी
प्रेम तुजपाशी तैसे, तुझ्या मनात शोधी
प्रेमाने सुख शांती मिळे पुर्ति ॥२ ॥ मानवा प्रेम तू...

प्रेम हे ध्यानी मनी ,स्वप्नी जागृती राही
अंतरी सहा शत्रुंचे, मुळी ना चाले काही
प्रेमाने दुख सारे, ओसरती ॥३ ॥ मानवा प्रेम तू...

प्रेम दे अन घे खुप, प्रेम ईश्वरी रूप
प्रेम हे गायनाचे, राग भैरवी भुप
प्रेम हे एकनाथा, जीवा स्फुर्ति ॥४ ॥ मानवा प्रेम तू...

गीतकार :- एकनाथ कांबळे.